श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान
तुळजापूर, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र )-४१३ ६०१
दूरध्वनी : ०२४७१ - २४२०३१

Shri Tuljabhavani Temple Trust
Tuljapur, Dist. Osmanabad (Mah.) - 413 601
Tel. : 02471 - 242031

Web site: www.tuljabhavanimandir.org ▪ E-mail : shrituljabhavanitemple@gmail.com

ISO : 9002 : 2008

जा.क्र.2021/श्रीतुभमंसंतु/धार्मिक/शा.न.21-22/ 1215 दि: 01/10/2021

संदर्भ : 1. महाराष्ट्र शासनाचे DMU/2020/CR.92/Dis-1, दि.04 एप्रिल 2021 रोजीचे आदेश.
2. महाराष्ट्र शासनाचे दि. 24 सप्टेंबर 2021 रोजीचे आदेश.
3. मा.जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद यांचे दिनांक 28/09/2021 रोजीचे आदेश.

# प्रेसनोट

संदर्भ क्र. 1 अन्वये Covid-19 या साथीच्या महामारीचा प्रादुर्भाव रोखणेसाठी दिनांक 04 एप्रिल 2021 रोजी महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व धार्मिकस्थळे बंद ठेवण्याचे निर्देश दिले होते. तथापी, संदर्भ क्र.2 चे शासन आदेशान्वये Containment Zone चे बाहेरील क्षेत्रातील धार्मिकस्थळे व प्रार्थनास्थळे दिनांक 07 ऑक्टोंबर 2021 रोजीपासुन उघडणेबाबत आदेशीत केले आहे.

1. उपरोक्त संदर्भ क्र.2 चे शासन आदेशानुसार श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर श्री देविजींचे दर्शनाकरीता **भाविकांसाठी दिनांक 07 ऑक्टोंबर 2021 रोजी सायंकाळी 06-00 वाजेपासून खुले करण्यात येत आहे.**
2. पुजारी बांधव व सेवेधारी यांना दिनांक 07 ऑक्टोंबर 2021 रोजी सायंकाळी 06-00 वाजेपासुन मंदिरात प्रवेश देण्यात येईल. तसेच शारदीय नवरात्र महोत्सव 2019 साली दिलेले ओळखपत्र सोबत ठेवणे अनिवार्य राहील. शिवाय मास्क घालणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे पुजारी बांधवांनी मंदिरात प्रवेश करतेवेळी मंदिर प्रशासनाने ठरवून दिलेल्या ड्रेसकोडमध्ये असणे आवश्यक आहे. तथापी, मंदिर गाभारा व मंदिर परिसरात भाविकांचे कोणतेही कुलाचार विधी करता येणार नाहीत.
3. या महोत्सव काळात दररोज केवळ 15 हजार भाविकांना मंदिरामध्ये प्रवेश असेल. मात्र त्यांना अभिषेक पुजा व कुलाचार विधी करण्यास परवानगी नाही.
4. कोरोना रोगाचे पार्श्वभूमीवर COVID-19 Vaccination- 2 Dose (दोन लस) घेतलेल्या भाविकांना श्री देविजींच्या दर्शनासाठी मंदिरात प्रवेश देण्यात येईल.
5. श्री तुळजाभवानी मंदिरात वय 65 वर्षाचे वरील ज्येष्ठ नागरिक, दुर्धर आजारग्रस्त, गरोदर स्त्रिया व 10 वर्षाखालील बालकांना प्रवेश दिला जाणार नाही.
6. मंदिरात प्रवेश करतेवेळी मास्क घालणे अनिवार्य आहे.
7. मर्यादित स्वरुपात ऑनलाईन प्रवेशपासची सुविधा मंदिराचे www.shreetuljabhavani.org संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून दिनांक 06 ऑक्टोंबर 2021 पासून मंदिर प्रवेशपासासाठी नोंदणी करता येईल.
8. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी दिनांक 21 ऑक्टोंबर 2021 पर्यंत मंदिराच्या परिसरातील 200 मीटरपर्यंत सोललेले नारळ आणि सुटे तेल विक्री करण्यास बंदी असेल.
9. संदर्भ क्र. 3 नुसार मा. जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद यांचे आदेशाप्रमाणे दिनांक 18/10/2021 ते दिनांक 20/10/2021 रोजी होणारी कोजागिरी पौर्णिमा यात्रा रद्द करण्यात येत आहे. त्यादिवशी फक्त महंत, सेवेकरी, पुजारी, मानकरी यांचे उपस्थितीत श्री तुळजाभवानी देविजींची पुजा विधी करण्यात येतील. महंत, सेवेकरी, पुजारी, मानकरी व तुळजापूर शहरातील नागरिक यांचेव्यतिरिक्त इतरांना तुळजापूर शहरात दिनांक 18/10/2021 ते दिनांक 20/10/2021 या दरम्यान प्रवेश दिला जाणार नाही.
10. सर्व भाविकांनी प्रशासनाकडून केलेल्या सुचनांचे आणि नियमांचे पालन करुन सहकार्य करावे, असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर करीत आहे.

**तहसीलदार**
तथा व्यवस्थापक (प्र),
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर